महाराष्ट्र शासन, आरोग्य विभाग,जिल्हा परिषद नागपुर
कार्यालय दुरध्वनीक्रमांक ०७१२-२५६४८४३, ५६०६५ ई-मेल-dhonagpur2019@gmail.com

# जाहीरात

## आरोग्य विभाग, जिल्हा परिषद, नागपूर

**वॅाक इन इंटरव्ह्यूव्दारे बी.ए.एम.एस.तदर्थ वैद्यकीय अधिकारी गट ब यांची कंत्राटी पध्दतीने पदे भरण्याबाबत.**

## थेट मुलाखत

मा. जिल्हाधिकारी, नागपूर यांचे अध्यक्षेखाली गठीत करण्यांत आलेल्या निवड समितीव्दारे आरोग्य सेवा, या सवंर्गातील नागपूर जिल्हा परिषद अंतर्गत असलेल्या आयुर्वेदीक /ॲलोपॅथिक/फिरते पथक इ.येथिल गट ब रिक्त पदे तदर्थ वैद्यकीय अधिकारी म्हणून कंत्राटी पध्दतीने रिक्त पदे ११ महिण्याचे कालावधीसाठी तात्पुरत्या स्वरुपात भरावयाची आहेत.

सदर वॅाक इन इंटरव्ह्यूसाठी www.nagpurzp.com या संकेत स्थळावर ऑनलाईन अर्ज करणे अनिवार्य आहे.ऑनलाईन अर्ज सादर न करणा-या उमेदवारांना वॅाक इन इंटरव्ह्यू च्या प्रक्रियेत सहभागी होता येणार नाही व त्यांचे म्हणणे कुठल्याही प्रकारे विचारात घेतले जाणार नाही.

ऑनलाईन अर्जाकरीता www.nagpurzp.com या वेबसाईटवर जाऊन अर्ज करावा.अर्ज करण्याची प्रक्रिया दिनांक ११.१०.२०२५ सकाळी १० वाजता पासून सुरु होऊन दिनांक १४.१०. २०२५ सायं.६ वाजेपर्यंत सुरु राहील.दिनांक १४.१०.२०२५ ला सायं.६ वाजता नंतर ऑनलाईन अर्ज सादर करण्याची लिंक बंद होईल याची नोंद घ्यावी.

ऑनलाईन अर्ज सादर करणा-यांनी मुळ प्रमाणपत्र तपासणीसाठी दिनांक १५.१०.२०२५ रोजी आरोग्य विभाग जि.प.नागपूर येथे सकाळी १० वाजता उपस्थित राहावे.

सर्व उमेदवारांचे मुळ प्रमाणपत्र तपासणी झाल्यानंतर गुणवत्ता यादी प्रकाशित करण्यात येईल व गुणवत्ता यादी नुसार समुपदेशन व निवड प्रक्रिया राबविण्यात येईल.

गुणवत्ता यादीतील अ.क्र.१ते१०० यांनी दिनांक १६.१०.२०२५ रोजी गुरुवार आरोग्य विभाग जिल्हा परिषद,नागपूर येथे उपस्थित राहावे.इच्छूक उमेदवारांनी मुलाखत वेळेच्या २ तास अगोदर आरोग्य विभाग जि.प.नागपूर येथे उपस्थित राहावे.आक्षेपाची पूर्तता झाल्यानंतर समुपदेशन प्रक्रिया राविण्यात येईल.

उमेदवारांनी येतांना सोबत बी.ए.एम.एस. पदव्युत्तर पदवी / पदविका यांचे सर्व वर्षाचे गुणपत्रिका, पदविका / पदवी प्रमाणपत्र, वैद्यकीय परिषदेचे नोंदणी प्रमाणपत्र, वयाचा दाखला,शासकीय सेवेचा अनुभव प्रमाणपत्र,अलीकडील पासपोर्ट साईजचा फोटो व आवश्यक प्रमाणपत्रांची मुळ व छायांकित प्रतीचा एक संच, फोटो असलेले ओळखपत्र इत्यादीसोबत घेवून येणे आवश्यक आहे.

उमेदवारांचे वय ५८ वर्षापेक्षा जास्त नसावे तसेच अनधिकृत गैरहजर असलेल्या /संपामध्ये सहभागी असलेले / शासन सेवेत शिस्त भंग कार्यवाहीकरिता काढून टाकलेले वैद्यकीय अधिकारी यांना अर्ज करता येणार नाही.

सदर बी.ए.एम.एस. पदाकरिता रुपये ४०,०००/- एवढे मानधन राहील.

स्वा/-
सदस्य सचिव,निवड समिती
तथा जिल्हा आरोग्य अधिकारी
जिल्हा परिषद, नागपूर

Click Here on link to Apply

अर्ज करण्यासाठी येथे क्लीक करावे: https://nhm.zpnagpur.in/